# <u>जाहिरात</u>

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राज्यातील 5 शासकीय परिचर्या महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गातील पदे सरळ सेवेने भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अटी व अर्हतेची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

2.**उपलब्ध पदसंख्या**:- 29

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | एसईबीसी | ईडब्लुएस | एकूण मागास वर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **प्राध्यापक-नि-प्राचार्य**-4(**गट - अ**) | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | – | – | – | – | – | – | 1 | 1 | – | 3 | 1 | 4 |
| **प्राध्यापक-नि-उपप्राचार्य**-4(**गट - अ**) | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | – | – | – | – | – | – | 1 | 1 | – | 3 | 1 | 4 |
| **प्राध्यापक**- 2(**गट - ब** ) | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | – | – | – | – | – | – | – | – | – | 1 | 1 | 2 |
| **सहयोगी प्राध्यापक** - 7(**गट - ब** )(Medical Surgical Nursing -1 , Community Nursing-2 , Pediatric Nursing-2, Psychiatric Nursing -1, Obstetric Nursing-1) | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | – | – | – | – | 1 | 1 | 1 | 6 | 1 | 7 |
| **सहायक प्राध्यापक / अधिव्याख्याता** -12(**गट - ब** )(Pediatric Nursing-3, Obstetric Nursing-3, Community Nursing-2, Medical Surgical Nursing -2, Psychiatric Nursing -2) | | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | - | 1 | 1 | 1 | – | – | – | 3 | 2 | 1 | 9 | 3 | 12 |

2.1 वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

2.2 शासन आदेशानुसार वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) या वर्गवारीसाठी आरक्षित असलेले पद आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या अंतर्गत परिवर्तनीयतेच्या धोरणानुसार सदर पदासाठी वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) या पैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

3. **वेतनश्रेणी** - 1.प्राध्यापक-नि-प्राचार्य- रू.15600-39100, ग्रेड पे - रू.6600
2.प्राध्यापक-नि-उपप्राचार्य- रू.15600-39100, ग्रेड पे - रू.5400
3.प्राध्यापक-रू.9300-34800, ग्रेड पे - रू.5000
4.सहयोगी प्राध्यापक- रू.9300-34800, ग्रेड पे - रू.4600
5.अधिव्याख्याता/सहायक प्राध्यापक- रू.9300-34800, ग्रेड पे - रू.4400

4.**पात्रता विषयक अटी**

4.1 **भारतीय नागरिक**.

4.2**वय**:- वयोमर्यादासरळ सेवेकरीता किमान 50 वर्षापेक्षा जास्त नसावे, मागासवर्गीय उमेदवारांसाठी शासनाने निर्धारित शिथिल केलेल्या वयोमर्यादा लागू राहील.परंतु, उमेदवाराची शैक्षणिक अर्हतता उच्च असल्यास, अथवा पात्र उमेदवार उपलब्ध होत नसल्यास अशावेळी वयाची अट शिथिलक्षम करण्याचा अधिकार शासनास राहील.

4.3 **शैक्षणिक अर्हता व अनुभव**: -

4.3.1.**प्राध्यापक-नि-प्राचार्य** :- भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून खालील नमूद विषयातील एम.एस्सी. (न.) शैक्षणिक अर्हता असावी, "बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", एमएस्सी नर्सिंग पदवीधारक, 15 वर्षाचा नर्स म्हणून नोंदणी झाल्यानंतरचा व 12 वर्ष नर्सिंन अध्यापनाचा अनुभव,तसेच एमएस्सी नंतरचा कमीत कमी 3 वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यकपरंतु, पी.एच.डी. असल्यास प्राधान्य.

4.3.2.**प्राध्यापक-नि-उपप्राचार्य** : -भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून खालील नमूद विषयातील एम.एस्सी. (न.) शैक्षणिक अर्हता असावी, "बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", एमएस्सी नर्सिंग पदवीधारक, 12 वर्षाचा नर्स म्हणून नोंदणी झाल्यानंतरचा व 10 वर्ष नर्सिंन अध्यापनाचा अनुभव,तसेच एमएस्सी नंतरचा कमीत कमी 3 वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक.

4.3.3.**प्राध्यापक** :- भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून खालील नमूद विषयातील एम.एस्सी. ( न.) शैक्षणिक अर्हता असावी, " बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", एमएस्सी नर्सिंग पदवीधारक, 10 वर्षाचा नर्स म्हणून नोंदणी झाल्यानंतरचा व 07 वर्ष नर्सिंन अध्यापनाचा अनुभव,तसेच एमएस्सी नंतरचा कमीत कमी 3 वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक.

4.3.4. **सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक/ अध्यिव्याख्याता**:-भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून खालील नमूद विषयातील एम.एस्सी. ( न.) शैक्षणिक अर्हता असावी,"बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा " मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", एमएस्सी नर्सिंग पदवीधारक, 08 वर्षाचा नर्स म्हणून नोंदणी झाल्यानंतरचा व 05 वर्ष नर्सिंन अध्यापनाचा अनुभव,तसेच एमएस्सी नंतरचा कमीत कमी 3 वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक.

4.3.5.**सहायक प्राध्यापक / अधिव्याख्याता** :-भारतातील कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून खालील नमूद विषयातील एम.एस्सी. ( न.) शैक्षणिक अर्हता असावी, " बालरोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"मनोविकार परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"सार्वजनिक आरोग्य परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"वैद्यक व शल्यचिकित्सा परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", किंवा"कर्करोग परिचर्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम", एमएस्सी नंतरचा कमीत कमी 3 वर्षे शिकविण्याचा अनुभव आवश्यक

**टिप** :- **मुलाखतीवेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये** 4. 3 **मधील कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे स्वरूप असलेला अनुभव नमूद केलेला असणे आवश्यक आहे**.

4.5 **उपरोक्त पदांचा परिविक्षा कालावधी** 2 **वर्षे राहील**.

5. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. अर्हता किमान असून, केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेव्दारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी संचालनालयाच्या www.med-edu.in/www.dmer.org या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. संचालनालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

6. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

7. प्रस्तुत पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील संचालनालयाच्याwww.med-edu.in/www.dmer.orgया वेबसाईटवर उपलब्ध आहे.

8. शुल्क:

8.1अमागास- रू.675/- 8.2 मागासवर्गीय - रू.405/-

**"ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा किंवा पात्रतेच्या इतर कोणत्याही निकषामध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे, अशा उमेदवारांची अमागास सर्वसाधारण वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही."**

9. **अर्ज करण्याची पध्दत** -

9.1 प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

9.2 पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड(Web-based)ऑनलाईन अर्ज www.med-edu.in/www.dmer.org या वेबसाईटव्दारे दिनांक 22/03/2019 ते दिनांक 30/03/2019 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

9.3 ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना संचालनालयाच्या www.med-edu.in/ www.dmer.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

9.4 विहित पध्दतीने संचालनालयास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

9.5 संचालनालयाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल -

1) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (2) नेटबँकिंग (3) डेबीट कार्ड (4) क्रेडिट कार्ड

9.6 परीक्षा शुल्क भरण्याकरीता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतींचा अवलंब करावा.

1. शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.
2. माझे खाते या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर Unpaid असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी Pay Now लिंक उपलब्ध असेल.
3. 'Pay Now' या लिंकवर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील.
   (1) ऑनलाईन पेमेंट (2) नागरी सुविधा केंद्र (3) चलनाद्वारे
4. उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

5. नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे.
6. उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेवून भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.
7. ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

10. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी 7 दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

11. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

12. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-1012/प्र.क्र.16/12/16-अ, दिनांक 13 ऑगस्ट,2014 आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

13. सदर भरती प्रक्रिया शासन निर्णय क्रमांक:एनयुआर-2009/प्र.क्र.194/परिचर्या, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई, दि.21.04.2014, शानिक्र:एनयुआर 2014/ प्र.क्र.82/2014 /परिचर्या,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई, दि.09.02.2017 व तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक: एनयुआर 2014/प्र.क्र.82/2014/ परिचर्या,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई , दि.20.03.2018

14. **मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व मूळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसलयास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल याची कृपया नोंद घ्यावी**.

15. चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे व मुलाखतीचे गुण मिळून उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

15. संचालनालयाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परीसरात तसेच मुलाखतीच्यावेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास/वापरण्यास सक्त मनाई आहे.

16. विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही, दिनांक 30/03/2019 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

17. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक 30/03/2019पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**ठिकाण : मुंबई** **संचालक**

**दिनांक :** **संचलनालय,वैद्यकीय शिक्षण आणिसंशोधन, मुंबई**